MHNG16000702-2017
आर.सी.सी.१००/२०१७
सरकार वि. शैलेश
नि.क्र. १८

**सरकार तर्फे साक्षदार कमांक ०२ याची जबानी**
**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि,**
**नाव** :- निळकंठ दिवान दिघोरे,
**वय** :- ४८ वर्षे **व्यवसाय** :- मजुरी,
**राहणार :**- खात, ता. मौदा, जि. नागपूर
-----------------------------------

**<u>सरतपास शपथेवर सरकार तर्फे ॲड. श्री.एम.एम. पाटणकर यांचे व्दारा</u>**

दि.२०.०६.२०१७ रोजी पोलिसांनी माझे घराजवळ येवून माझया सहया घेतल्या होत्या. पोलिसांनी माझे समक्ष घटनास्थळ पंचनामा केला नाही. माझे समक्ष पोलिसांनी काहीही जप्त केले नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुर माहित नाही. करीता सदर पंचनाम्यास सही पुरता **<u>नि.क्र.१९</u>** देण्यात येते.

**साक्षीदार सरकारी पक्षास समर्थन करीत नसल्याने सरकारी वकीलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवाणगी मागितली करीता परवानगी देण्यात येते.**

हे म्हणणे खरे आहे की पोलिसांनी दि.२०.०६.२०१७ रोजी मला सरकारी नळाजवळ बोलावले होते. हे म्हणणे खरे आहे की तेथे पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे आहे की त्यानंतर मी त्या पंचनाम्यावर सही केली होती. माझे घर घटनास्थळाला लागूनच असल्याने मला घटनास्थळावर बोलवले नसल्याचे व मी तेथेच उभा असल्याने मला साक्षीदार म्हणून सही करण्यास सांगितल्याने आधी तसे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला पंचनाम्यातील मजकुर वाचून दाखवला व त्यानंतर माझी सही घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यातील मजकुर वाचला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे श्री. ए.एस. रेवतकर यांचे व्दारे</u>.**

नाकारले.
श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by Santosh Pundlikrao Wankhade
Location: Mouda
Date: 2020.02.12 11:37:49 +0530

दिनांक: १०/०२/२०२०

(एस.पी.वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
मौदा.